**प्रेसनोट दि. १३.०९.२०२१**

श्री. संजय यमुना भाते, वय ४६ वर्ष, ग्रामविकास अधिकारी, कोसारी ता.जत जि.सांगली यांनी १०००/- रूपये लाच मागणी करून ती लाच स्विकारली असले बाबत सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत पंचायत समिती जत यांचेकडून मंजूर झालेल्या गोठयाचे काम तक्रारदार यांनी मजूर लावून सुरु केलेले आहे. सदर मजूरांचे हजेरी मस्टरवर सही करुन सदर मस्टर पंचायत समिती जत येथे पाठवीणेकरीता लोकसेवक भाते, ग्रामविकास अधिकारी कोसारी ता.जत यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१३.०९.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक १३.०९.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे गोठयाचे काम करणारे मजूर यांचे हजेरी मस्टरवर सही करुन मस्टर पंचायत समिती जत येथे पाठवीणेकरीता लोकसेवक भाते, ग्रामविकास अधिकारी कोसारी ता.जत यांनी २,०००/-रुपये लाचेची मागणी करुन चर्चेअंती तक्रारदार यांचेकडे १०००/- रूपये लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच संभाजीनगर, मोरे कॉलणी जत या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. संजय यमुना भाते, वय ४६ वर्ष, ग्रामविकास अधिकारी कोसारी रा.संभाजीनगर, मोरे कॉलणी जत ता.जत जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडून १०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. संजय यमुना भाते, वय ४६ वर्ष, ग्रामविकास अधिकारी कोसारी रा.संभाजीनगर, मोरे कॉलणी जत ता.जत जि.सांगली यांचे विरुध्द जत पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सांगली यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री.प्रशांत चौगुले, पोलीस अंमलदार संजय संकपाळ, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, संजय कलकुटगी, श्रीपती देशपांडे, अविनाश सागर, राधिका माने, सिमा माने व चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक
सत्यमेव जयते
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

(गुरूदत्त मोरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली